**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक समस्या एक समाजशास्त्रीय अध्ययन

**लीना वि. गादेवार**
संशोधन कर्ती
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

**प्राचार्य डॉ. ज्ञानेशवर गुरु म्हशाखेत्री**
मार्गदर्शक
कर्मवीर दादासाहेब देवतळे महाविद्यालय चार्मोशी
जिल्हा गडचिरोली

---

**सारांश :**

*भारत हा कृषीप्रधान देश आहे. भारताची 65 टक्के लोकसंख्या ही शेती आणि शेती निगडीत उद्योगाशी संबंधित आहे. प्रशासन, शासन, राज्यकर्ते, वैचारिक वर्ग गटात येणारे सर्वच आज शेतक-याच्या जीवन आणि समस्यावर भाष्य करीत असतात. आजच्या जागतीकरणाच्या युगात शेतकरी हा तांत्रिक, सुधारलेला विकसित झाला असला तरी त्याला भेडसावत असलेल्या समस्या सुध्दा वाढलेल्या आहेत. किंबहुना अशा समंस्यांचे स्वरुप, भिन्नता आणि आज कमालीची वाढलेली दिसते. शेतक-याच्या आत्महत्या विशेषतः महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेश हे राज्य यात अग्रेसर आहेत.*

*विविध समस्यांचा सर्वात जास्त प्रभाव आणि परिणाम हा अल्पभूधारक शेतक-यांवर झालेला आहे. प्रस्तुत लेखामध्ये अल्पभूधारक शेतक-याच्या महाराष्ट्रातील विदर्भ क्षेत्रातील मुख्यतः नागपूर जिल्हयातील शेतक-यांचा अभ्यास केलेला आहे. त्यांच्या समस्या निर्माण होण्याकरीता कारणीभूत असलेले घटक त्याचा प्रत्यक्ष परिणाम, शासनाची भुमिका आणि गावपातीळीवर करण्यात येणा-या विविध उपाययोजनांचा सविस्तरपणे अभ्यास केलेला आहे. (प्रमुख शब्द - समस्या, शासन, उपाययोजन, सुधारणा, कायदे इत्यादी)*

---

**संशोधनाची उद्दिष्टे** :

1. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या सामाजिक समस्यांचा आढावा घेणे.
2. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या विकासाकरिता शासकीय योजनांचा आढावा घेणे.
3. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडवण्याकरिता उपाययोजना सुचवणे.

**तथ्य संकलन** :

प्रस्तुत शोध निबंध लिहीत असताना प्रामुख्याने दुय्यम स्वरूपाची माहिती तथ्याचा वापर करण्यात आला आहे . पुस्तके , लेख, मासिके वर्तमानपत्र इत्यादींच्या माध्यमातून माहिती सांगितली आहे.

**ग्रामीण समाजाची संकल्पना आणि व्याख्या :**

ग्रामीण विकास ही फार व्यापक संकल्पना आहे. त्यातील विकास हा शब्द प्रगत अवस्था किंवा उन्नती

सुचित करतो. विकास ही विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी (मिळविण्यासाठी) निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. तर पुढील १५ ते २० वर्षात आपण जे काही करणार त्याने संपूर्ण विकास साधता येईल. विकास ही कधीही न थांबणारी चिरंजीवी प्रक्रिया आहे. आज विकासाचे स्वरुप बदलले आहे. आता विकास हा फक्त आर्थिक स्वरुपाचा नसून सर्वपक्षीय संतुलीत विकासाला संपूर्ण सामाजिक विकास म्हटल्या जातो. खÚया विकासात मनुष्य केंद्रस्थानी असावा असा विकासाचा नवीन दृष्टिकोन आहे.

ग्रामीण विकासाच्या संदर्भात असे म्हणता येईल की ग्रामीण भागाचा विकास म्हणजे तेथील जनतेचा आर्थिक, सामाजिक व सांसकृतिक स्तर उंचावणे, त्याच बरोबर त्यांना पायाभूत सुविधांची उपलब्धता करुण देणे. ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण भागात राहणाÚया लोकांच्या भौतिक, सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणने म्हणजे ग्रामीण विकास होय.

ग्रामीण पर्यावरणात राहणाÚया लोकांना त्यांचे जीवनस्तर उंचावून जीवन प्रक्रियेला आत्मपोषण बनविण्याची विधी म्हणून ग्रामीण समुदाय विकास याकडे पाहिले जाते. ग्रामीण समुदाय विकासाबाबत स्वास्थ, शिक्षण, पिण्याचे पाणी, वीज, स्वच्छता, इत्यादी बाबतीत सुधारणा करुन त्यांच्या मानसिकतेत परिवर्तन घडविणे होय.

ग्रामीण समुदाय विकासात निरंतर विकासाच्या संकल्पनेतून ग्रामीण स्वायतत्ता खेडयांना मिळणे, गावाच्या गरजा गावातच पूर्ण करणे, खेडे स्वावलंबी होणे, ग्रामोदयोगाचे महत्त्व वाढविणे इत्यादींचा स्वीकार करुन ग्रामीण समुदाय विकासातून ग्रामसुधार, ग्रामविकासाचे कार्य होऊ शकते.

**ग्रामीण विकासाची व्याख्या :**

ग्रामीण विकासाची व्याख्या करतांना भिन्न-भिन्न पैलूंवर भर देऊन केलेल्या वेगवेगळया तंज्ञांच्या वेगवेगळया व्याख्या बघावयास मिळतात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण विकासाच्या प्रश्ना कडे विशेष लक्ष देण्यात येवू लागले. अन्नधान्याचे उत्पादन वाढविणे ही निकडीची समस्या होती, त्याबाबत नेमलेल्या अधिक धान्य पिकवा समिती ने १९५१ साली सादर केलेल्या अहवालात शेती सुधारणे बरोबरच ग्रामीण विकासाच्या समग्र समस्येबाबत विचार मांडले. त्यातूनच समूह विकास योजना व राष्ट्रीय विस्तार सेवा या महत्वपूर्ण योजना विकसीत झाल्या. ग्रामीण विकासाचे विविध प्रश्न हाताळण्यासाठी सरकारच्या वेगवेगळया खात्यांमार्फत आखलेल्या योजनांना पंचवार्षिक योजनांत स्थान देण्यात आले. समुह विकास योजनेची सुरुवात २ अक्टोबर १९५२ रोजी झाली. १९५५-५६ च्या अखेर भारताच्या एक तृतीयांश ग्रामीण भागांना ही योजना लागू करण्यात आली. दुस-या योजनेच्या अखेरीस ही योजना सर्व ग्रामीण भागात चालू झाली. समूह विकास योजनांचे मूल्यामापन करण्यासाठी बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली १९५६ अभ्यागट नेमण्यात आला. या गटाच्या अभ्यासानुसार समूहविकासा योजनेच्या कार्यात बदल करुन पंचायत राजची कल्पना स्वीकारली जावून खेडेगाव, तालुका आणि जिल्हा पातळीवर विकास कार्यक्रमांची जबाबदारी लोकनियुक्त प्रतिनिधींवर टाकण्यात आली.

केंद्र व राज्य सरकारच्या ग्रामविकासाकरीता भरपूर योजना आहेत. फक्त शासनाने त्या योजना पूर्णपणे राबविल्या जाव्यात याकरिता प्रभावीपणे लक्ष केंद्रीत करायला पाहिजे. शेतक-यांनी प्रति एकरी उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न केले पाहिजे याकरिता पाण्याचे नियोजन, नवीन कृषितंत्र, उत्तम बियाणे, रोगमुक्त उत्पादन याकरिता अभ्यास पूर्ण आर्थिक नियोजन करुन ध्येय गाठण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बँका, सहकारी पत संस्था, पत पेढया इत्यादी ठिकाणाहून शेतक-यांना वेळेवर सुलभ दराने कर्जपुरवठा होऊ शकेल तसेच आर्थिक निकषांवर सबसीडी देण्याकडे लक्ष पुरविले पाहिजे. जलसिंचनाच्या सुविधा वाढवितांना नदया जोड प्रकल्प पूर्ण करण्याकडे केंद्र सरकारने प्राध्यन दयावयास हवे. जलसंकट दूर करण्यासाठी ग्रामस्थांनी लोकचळवळीतून पुढाकार घेवून, काम करायला पाहिजे. गावातील अनुभवी, शिक्षीत, मान्यवरांनी गावातील तंटे, भांडणे, दूर करण्याकरिता पुढाकार घेतला पाहिजे. जेणेकरुन गावक-यांच्या श्रमाचा पैसा व बहुमूल्य वेळ कोर्टाच्या चकरा मारण्यात वाया जाऊ नये असे प्रयत्न व्हायला पाहिजे. ग्रामस्थांनी ग्रामसभेला स्वतःहून उपस्थित राहून होणा-या कामकाजाचा निर्णयाचा आढावा घेतला पाहिजे. सर्वांगीण ग्रामविकास ही केवळ शासनाची जबाबदारी नसून गावातील जबाबदार तरुण शिक्षित ग्रामस्थांनी पुढाकार घ्यायला पाहिजे.

**अल्पभुधारक शेतकरी आणि सामाजिक समस्या :**

आज शासनांनी विविध योजना शासनाने कार्यान्वीत केलेल्या आहेत. अंशतः कर्जमाफी विविध स्तरावर लागू केलेले आहे. 'गावकाडा' या पुस्तकामध्ये त्रि.नI. अत्रे यांनी शेतकरी जीवन आणि समस्यावर सविस्तर वर्णन केलेले आहे. शेतीतील उत्पन्न कमी असल्याने समस्याचे दृष्टचक्र त्यांच्या जीवनात सातत्याने आहे. शेतीवर उद्योगधंदे, पशुधन आणि शेतकरी हे त्रिकुट महत्वाचे ठरते. राब राब राबूनही शेतक-याचे जीवनमान उंचावलेले नाही. प्राचीन काळापासून शेती विभागाला भारतात महत्वाचे स्थान आहे. हरीतक्रांती, श्वेतक्रांती, धवलक्रांती, रस्तेक्रांती, वित्तीय आणि नियोजन आयोगाची भुमिका सुध्दा शेतकरी विकासात महत्वाची भुमिका बजावतात. आज सर्वच स्तरातून शेती क्षेत्र विकसित करण्याकरिता विविध उपायांचा विचार केलेला आहे. त्यामध्ये साहित्य, संस्कृती, प्रसारमाध्यमे, रेडिओ, टि. व्ही. इत्यादीचा समावेश होतो.

अल्पभूधारक शेतक-याची शेती ही मुख्यतः नैसर्गिक स्त्रोतांवर अवलंबून आहे. पाण्याच्या सोयीचा अभाव, पैशाचा अभाव, आधुनिक, तांत्रिक ज्ञान, खते, आधुनिक बि-बियाणे यापासून आजही अल्पभूधारक शेतकरी दूर आहेत. त्याच्या मध्ये विशेषतः शेती तुकीकरण भावाभावा मधील जमीनीचे हिस्सेदारी आणि त्या अंतर्गत निर्माण होणारा संघर्ष हा मुख्यतः कारणीभूत आहे. एकेरी पिक पध्दती, शैक्षणिक शेती करण्याची पध्दत आणि त्यातून तुटपुंजे उत्पन्न हया दृष्ट्र्याक्षेत्रात आज अल्पभुधारक शेतकरी पुरता बुजुन गेलेला आहे.

**अल्पभूधारक शेतकरी - सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवन :**

आर्थिक समस्या ही सर्वच समस्यांशी संबंधित असते. अल्पभूधारक शेतकरी हे आर्थिक गटात मोडत असल्याने त्यांच्या इतर समस्या सुध्दा त्या अनुशंगाने प्रभावित होत असतात. आर्थिक आणि सामाजिक समस्या हया शेतक-यांच्या जीवनातील एकाच नाण्यांच्या दोन बाजू आहेत. आर्थिक टंचाईमुळे कौटुंबिक जीवनमान तणाव निर्माण होवून घटस्फोटा पर्यंत सुध्दा प्रकरणे गेल्याचे उदाहरणे सदर अध्ययन क्षेत्रात आढळतात.

उत्पादन खर्च आंणि शेत मालाला भाव यांच्यात तारतम्य मिळतांना दिसून येत नाही. साहजीकच गरीबीचे दृष्टचक्र त्यांना भेटून आले. एकाच वेळा सर्वच शेतक-यांचा माल हा शेतमंडीत येत असल्याने दणकण भाव खाली येतो आणि मेहनतीने पिकवलेला माल कवडीमोल भावाने जातो. दुष्काळ, अति वृष्टि इत्यादींचा ससेमिरा तर त्यांना लाभलेलाच असतो. प्रत्येक गावात ग्रामीण समस्या, त्यांच्या व्यथा हया सारख्याच असतात. शासनाद्वारे कितीही मदत केली गेली तरी ती अपूरी होते. दरवर्षि कुठल्याना कुठल्या स्वरुपात शेतक-यांना नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागतो. अतीरिक्त बील, कर्जबाजारीपणा हया तर बहूतेक सर्वच अल्पभूधारक शेतक-याच्या जीवनात असतात.

**अल्पभूधारक शेतकरी आणि समस्या :**

अल्पभूधारक शेतकरी आणि समस्या याचा घनिष्ट संबंध आहे. ही परिस्थिती बहूतेक थोडया फार फरकाने सर्वच क्षेत्रात आढळून येते. विदर्भ प्रांत सुध्दा याला वेगळे नाही.

खालील मुख्य समस्या अल्पभुधारक शेतक-यांच्या जीवनात दिसून येतात -

1) गरीबी 2) व्यसनाधिनता 3) नैसर्गीक दृष्टचक्र 4) अज्ञान 5) अंधश्रध्दा 6) कौटुंबिक समस्या 7) कर्जबाजारीपणा 8) शेतीचे तुकडीकरण 9) तांत्रिक शेतीबाबत उदासिनता 10) मुलभूत सोयी सवलतीचा अभाव 11) सावकाराचा फाश 12) शेतक-यांच्या आत्महत्या 13) शैक्षणिक समस्या 14) मानसिक समस्या 15) जलसिंचनाचा अभाव इत्यादी.

**अल्पभुधारक शेतक-यांसाठी शासनाचे धोरण :**

शेती हे एक राष्ट्रीय कार्य आहे. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. शेतकरी दुस-याच्या जीवनात प्रकाश टाकत असला तरी त्याचे जीवन मात्र अंधकारमय आहे. शासन आणि प्रशासन हे शेतकरी विकासाचे प्रमुख साधने आहेत. स्वयंसेवी संघटना, शेतकरी सामाजिक चळवळी, समाजसेवक हयाचे कार्य सुध्दा शेतकरी विकासा करिता अत्यंत उपयुक्त ठरते.

शेतकरी समस्ये वरती शासनाच्या विविध उपाययोजनांची फुंकर घातली जाते. शासनाच्या विविध योजनांचा साधक बाधक परिणाम आणि लाभ काही प्रमाणात झालेला दिसून येतो. महाराष्ट्र शासनाच्या काही महत्वाच्या योजना –

1) विज पुरवठा आणि पांदन रस्ता दुरुस्ती कार्यक्रम
2) निर्धारित हमी भाव आणि साधने हयांचे कमी प्रमाण
3) सिंचनाच्या सोसी सवलती
4) प्राचीन शेती प्रक्रियला तांत्रिकतेची जोड
5) पडीक जमीनी सुपीकीकरण योजना
6) मिश्र पिक पध्दती, प्रोत्साहन आणि माहीती
7) शेतीविषय ज्ञानाचे प्रसारण

8) आधुनिक, संकरित बीयाणे पुरवठा
9) रासायणिक खते आणि कृषि औषधे
10) पशुवैद्यकीय सुविधा आणि जोडधंदे करण्यास प्रोत्साहन.

**समारोप :**

शासनाने शहरीकरणा वर नियंत्रण आणावे. ते नियंत्रण आणण्यासाठी विकासाचे लक्ष ग्रामीण क्षेत्रावर केंद्रीत करावे. ग्रामीण क्षेत्रात शहरातील सर्व सोयी उपलब्ध करून द्याव्यात. आज तसे फारसे करणे कठीण नाही. गरज इच्छा शक्तीची आहे. छोटे छोटे उद्योग कुटीर उद्योग गावोगावी उघडावे. त्यामुळे लोकांना जोडधंदाही मिळेल व त्यांची आर्थिक स्थिती डबघाईला येणार नाही. असे केल्याने होणाÚया आत्महत्येवर ब-याच प्रमाणात नियंत्रण करता येऊ शकते. ज्या ठिकाणी सिंचनाच्या सोयी नाही त्याठिकाणी त्या कराव्यात. ज्यामुळे बारामाही पिके शेतक-याला घेता येतील. यातून त्यांची आर्थिक समृद्धी वाढल्यास सहज मदत होवू शकते. यांनी शेती बरोबरच शेतीपूरक जोडधंदे करून आपले उत्पादन वाढविल्यास आर्थिक स्थिती सुधारता येते. वरील सर्व विशेषणावरुन अल्पभुधारक शेतक-याचा सर्वांगिण अभ्यास करता येतो. त्याच्या जीवनात आमुलाग्र बदल करणे आज काळाची गरज ठरली आहे.

**संदर्भ ग्रंथसूची** :


- घाटोळ, रा. ना., ग्रामीण समाजशास्त्र व सामुदायीक विकास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, द्वितीय आवृत्ती, 1994.
- घाटोळ, रा. ना. समाजशास्त्रीय संशोधन तत्वे आणि पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, रामादासपेठ, नागपूर, चैथी आवृत्ती, 1990.
- दांडेकर वि. म. महाराष्ट्राची ग्रामीण समाजरचना, संशोधन संस्था, पुणे, 1957.
- नागगोंडे, गुरुनाथ, ग्रामीण समाजशास्त्र, कान्टिनेन्टल, प्रकाशन, पुणे.
- मदन. जी. आर. विकास का समाजशास्त्र, विवेक प्रकाशन, दिल्ली.
- आर्थिक सुधारणा आणि विकासाचा मानवी चेहरा, डॉ. भालचंद्र मुणगेकर, गृह प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, 2012.
- 'गुगल' कथा माहितीच्या अजस्त्र कारखान्याची, अतुल कहाते, मनोविकास प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, 2012.
- महाराष्ट्र ग्राम स्वच्छता अधिनियम, महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग.
- शेतीचा विकास-काल, आज आणि उदया, डॉ. मुकुंद गायकवाड, कान्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 2003
- 'शेत' डॉ. आबासाहेब कल्याणकर, गोदावरी प्रकाशन, खरबी, 2011